N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): गडचिरोली **P.S.**(ठाणे): चामोर्शी **Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0564 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/10/2020 21:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 07/10/2020

**Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/10/2020

**Time From** (वेळेपासून): 11:17 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 15:16 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/10/2020 **Time** (वेळ): 21:05 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 031 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/10/2020 21:05 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 19 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पोमके घोट, घोट बायपास रेगडी रोड ,चामोर्शी , 442603

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री शाम लव हलदार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव):

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

पोलीस स्टेशन, चामोर्शी जि. गडचिरोली

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विष्णुपूर, चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |
| 2 | स्थायी पता | विष्णुपूर, चामोर्शी ,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7823890254

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | hanumant vilas tarte | | | 1. पोलीस मदत केन्द्र घोट,चामोर्शी , चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442603 |
| 2 | पो.शि 2759 श्री सतिश उकंड जाधव | | | 1. पोलीस मदत केन्द्र घोट, चामोर्शी , चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442603 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि दिनांक

07/10/2020नांव:- श्री शाम लव हलदार, वय 35 वर्षे, जात नमोशुद्र (ओपन), धंदा -शेती, मु. पो. विष्णुपूर, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. मो.नं. 7823890254मी दिनांक 07/10/2020 रोजी श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली, कम्प घोट यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.माझे वडील वयोवृध्द असल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी माझेवर आहे. माझे कुटुंबाचे उदरनिर्वाहासाठी मी वडीलोपार्जीत शेती करतो. संपुर्ण कुटुंबाची जबाबदारी माझेवर असल्याने तसेच माझी प्रकृती चांगली राहत नाही. त्यामुळे मी माझे शेताजवळच असलेल्या जंगलात स्वतःला पिण्याकरीता मोहफुलाची दारु काढतो. अंदाजे एक दोन दिवसा अगोदर पोलीस स्टेशन घोट येथील पीएसआय श्री तरटे व तीन चार पोलीस माझे शेतात आले. त्यावेळी मी शेतातच होतो. तेव्हा श्री तरटे मला म्हणाले की, ही हातभट्टी कुणाची आहे. येथे मोहफुलाची दारु कोण काढतो.? तेव्हा श्री तरटे, पीएसआय यांना म्हणालो की, साहेब हे शेत माझेच असून ही हातभट्टी सुध्दा माझीच आहे. परंतु मी फक्त स्वतः ला पिण्यासाठीच मोहफुलाची दारु काढत असतो. तुम्ही सर्वत्र चौकशी करु शकता. तेव्हा श्री तरटे, पीएसआय मला म्हणाले की, तु काही बोलु नकोस, तु मला सांगशील काय? तु दारुचा धंदा करतोस व स्वतःला पिण्यासाठी काढलो म्हणून खोट बोलत आहेस. तुझ्यावर दारुचा गुन्हा दाखल करतो. असे म्हणाले. तेव्हा मी साहेबांना विनंती केली की, साहेब मी खोट बोलत नाही. तुम्हाला खर वाटत नसेल तर माझ पुर्ण घर चेक करु शकता. मी दारु विकण्यासाठी काढली नाही. तेव्हा श्री तरटे साहेब मला म्हणाले की, मला काही सांगू नको. तु स्वतःला पिण्यासाठी काढला असशिल तरी दारुचा धंदा करत म्हणून तुझ्यावर गुन्हा दाखल करील. जर तुला या सर्व भानगडीत पडायच नसेल तर मला महीन्याला 30,000/- रुपये दयावे लागतील. नाहीतर तुझ्यावर दारुचा गुन्हा दाखल करतो. त्यावेळी मी श्री तरटे, पीएसआय साहेबांना विनंती केली की, साहेब मी गरीब माणूस आहे. मी फक्त स्वतः ला पिण्यासाठी दारु काढलेली आहे. काहीतरी विचार करा साहेब असे म्हणालो. त्यावर श्री तरटे साहेब मला म्हणाले की, ठिक आहे. तुला यातुन सुटका पाहीजे असल्यास मला 15,000/- रुपये दर महीन्याला दयावेच लागतील. तु जर मला पैसे दिले नाही तर तु दारु स्वतःला पिण्यासाठी काढ नाहीतर नको काढु मी तुझ्यावर दारुचा गुन्हा दाखल करील व जेलमध्ये टाकीन. असे म्हणाल्याने मी खुप घाबरुन गेलो व भिती पोटी ठिक आहे साहेब आता तर

माझेकडे [illegible] पैसे नाहीत. मी आपणास पैसे जमल्यावर येवून भेटतो. असे म्हटल्यावर श्री तरटे, पिएसआय व त्यांचे सोबतचे तीन चार पोलीसवाले माझे शेतातुन निघून गेले. श्री तरटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मदत केंद्र घोट, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांनी मला दारुबंदी कायद्याखाली गुन्हा दाखल न करण्याचे कामाकरीता प्रतीमाह हप्ता 15,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केलेली आहे. श्री तरटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मदत केंद्र घोट, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांना 15,000/- रुपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी 15,000/- रुपये घेऊन आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली, कम्प चामोर्शी येथे तक्रार देण्यास आलो.श्री तरटे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मदत केंद्र घोट, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली यांचेषी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 15,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे.त्यानंतर श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी त्यांचे सोबत असलेल्या 2 शासकिय पंचांना बोलावून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा टंकलीखीत केलेला व माझी सही असलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी व्हईस रेकर्डर कष्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 15,000/- (रू. 500/- दराच्या 30 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 07/10/2020 रोजी श्री रवि जी. राजुलवार, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री तरटे, पीएसआय, यांचेकडे जाण्यास पोलीस मदत केंद्र घोट येथे जाण्यास माझे मोटरसायकलने रवाना केले. श्री तरटे, पीएसआय यांनी पंच क्रं. 1 यांचे समक्ष माझे विरुध्द दारुबंदी कायद्याखाली गुन्हा दाखल न करण्याचे कामाकरीता प्रतीमाह हप्ता रू. 15,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 10,000/- लाच रक्कम आरोपी क्रमांक 2 यांचेकडे देण्याचे सांगून त्यांचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला.पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री तरटे, पोलीस उप निरीक्षक, पोमके घोट यांनी माझे विरुध्द दारुबंदी कायद्याखाली गुन्हा दाखल न करण्याचे कामाकरीता प्रतीमाह हप्ता रू. 15,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 10,000/- लाच रक्कम थोडयावेळाने श्री सतिश जाधव, पोलीस शिपाई पोमके घोट यांचे मार्फतीने स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री तरटे, पोलीस उपनिरीक्षक व श्री सतिश जाधव, पोलीस शिपाई यांचेविरूद्ध आज दिनांक 07/10/2020 रोजी पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या उजव्या खिष्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील दुप्पटा डोक्यास बांधावा व गाडीच्या आत रक्कम स्विकारल्यास गाडीची पार्कींग लाईट इंडीकेटर्स सुरु करावी. असा इशारा करण्याबाबत मला पंचासमक्ष सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह मौजा घोट, पोलीस मदत केंद्र येथे श्री सतिश जाधव यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर काही वेळाने श्री जाधव हे घोट बायपास रोडजवळ आले. त्यावेळी मी त्यांना सांगीतले की, श्री तरटे साहेबांनी मला 15,000 रुपये मागीतले होते. मी त्यांना विनंती केली असता, त्यांनी बघु असे म्हटले होते. तरी तुम्ही त्यांना फोन करुन विचारुन घ्या. वरुन श्री जाधव यांनी श्री तरटे साहेबांना फोन लावला. त्यानंतर श्री जाधव यांनी मला दोन्ही हाताने इशारा करुन टेन दे दो असे म्हणाल्याने मी अँथ्रसिन पावडर लावलेली रू. 15,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिश्यातुन काढुन त्यातुन 10,000/- रुपये श्री जाधव, पोलीस यांना दिली असता, त्यांनी लाच रक्कम रू. 10,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजत होते. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत असतांना माझे गाडीचे पार्कींग लाईट सुरु करुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री सतिश जाधव, पोलीस यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. तसेच श्री तरटे, पोलीस उपनिरीक्षक यांना पोमके घोट येथुन ताब्यात घेतले. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री रवि जी. राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री हनुमंत विलास तरटे, वय 35 वर्षे, धंदा- नौकरी, पोलीस उपनिरीक्षक, वर्ग-2, पोलीस मदत केंद्र घोट, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे विरुध्द दारुबंदी कायद्याखाली गुन्हा दाखल न करण्याचे कामाकरीता प्रतीमाह हप्ता रू. 15,000/- लाच रक्कमेची मागणी करून लोकसेवक श्री सतिश उकंड जाधव, वय 30 वर्षे, धंदा-नौकरी, पोलीस शिपाई ब. नं. 2759, वर्ग-3, पोलीस मदत केंद्र घोट यांचे मार्फतीने तडजोडीअंती रु. 10,000/- लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष-
मपोउपनि/निशा जिवणदास खोब्रागडे पोलीस स्टेशन चामोर्शी रिपोर्टर- यांची ईग्रजीमध्ये सही

13. Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAVI GOPALRAO RAJULWAR
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): DGPRGRM7902 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): JITENDRA EKHANATH BORKAF
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN70652

निशा जि. खोब्रागडे
म. पोलीस उपनिरीक्षक
पो. स्टे. चामोर्शी

पोलीस स्टेशन, चामोर्शी
जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 07/06/1984 | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

